RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ७५

दि.११ जुलै २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# विनाअट सरसकट शेतकरी कर्जमाफी जाहीर

## शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी मिळणार, ५० हजारांची अट काढली, ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ – सीएम देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील बळीराजासाठी राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक घोषणा केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दिली जाणारी ५० हजार रुपये भरण्याची जाचक अट सरकारने पूर्णपणे काढून टाकली आहे. यामुळे राज्यातील तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी मिळणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विरोधकांकडून या कर्जमाफी योजनेवर होत असलेल्या टीकेला फडणवीस यांनी आकडेवारीसह सडेतोड उत्तर दिले. ''या योजनेमुळे केवळ ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल आणि १२-१३ हजार कोटींचाच लाभ मिळेल, हा दावा पूर्णपणे चुकीचा आहे. राष्ट्रीयकृत, व्यापारी आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून गोळा केलेल्या अचूक डेटानुसार, ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळवून देणारी ऐतिहासिक योजना आहे,'' असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.





कर्जमाफीबाबत अभ्यास करण्यासाठी सरकारने प्रवीण परदेशी समिती स्थापन केली होती. वारंवार कर्जमाफी दिल्यास शेतकरी कर्ज भरणे थांबवतील आणि बँकिंग व्यवस्था कोलमडेल, अशी भीती या समितीने व्यक्त केली होती. त्यामुळे मागील योजनेत लाभ घेतलेल्यांना पुन्हा कर्जमाफी देताना काही रक्कम (उदा. ५० हजार) भरण्याची अट सुचवली होती. मात्र, महायुतीच्या सर्व आमदारांनी ही ५० हजारांची अट रद्द करण्याची जोरदार मागणी लावून धरली.

ही अट काढल्यास तिजोरीवर ३ ते ४ हजार कोटींचा अतिरिक्त भुर्दंड पडेल आणि दोन लाख शेतकरी लाभापासून वंचित राहतील, हे माहीत असूनही व्यापक हिताचा विचार करून सरकारने ही अट मागे घेण्याचा निर्णय घेतला. तसेच, जुन्या (२६-२७) अटीही वगळण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. आधीच्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील त्रुटी दूर करून सरकारने ही नवी योजना अधिक लवचिक बनवली आहे. आधीच्या योजनेत शेतकऱ्याची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा केवळ १ रुपया जरी जास्त असली, तरी त्याला कर्जमाफीचा लाभ मिळत नव्हता. मात्र, अहिल्यादेवी होळकर योजना या नव्या योजनेत ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांनाही सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच, महात्मा फुले योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांनाही या नव्या योजनेत सामावून घेतले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. कर्जमाफीमागची सरकारची भूमिका स्पष्ट करताना फडणवीस म्हणाले, ''कोणत्याही कर्जमाफीने शेतकरी कधीही श्रीमंत होऊ शकत नाही, पण तो क्रेडिटवर्दी ( – कर्ज घेण्यास पात्र) नक्कीच होतो. शेतकऱ्याला पुन्हा खासगी सावकाराकडे जावे लागू नये, हेच या कर्जमाफीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

विधानसभा निवडणुकीच्या वेळी आम्ही कर्जमाफीचा शब्द दिला होता. सध्या आम्ही सर्व निवडणुका जिंकलो असल्याने हा निर्णय आम्ही २०२९ पर्यंतही लांबवू शकलो असतो. पण, जेव्हा शेतकरी अडचणीत असतो, तेव्हा त्याला तातडीने मदत मिळालीच पाहिजे, या भावनेतून आम्ही ही आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी जाहीर केली आहे,'' असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## महापुरुषांच्या यादीत अण्णाभाऊ साठे व उस्ताद लहुजी साळवे यांची नावे नसल्याचा दावा; २०२२ मधील पत्रव्यवहार चर्चेत




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथे ६ जुलै रोजी आयोजित अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चादरम्यान हिंगोलीचे दादासाहेब शेळके यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या अधिपत्याखालील डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनच्या पत्राचा संदर्भ देत, केंद्र सरकारच्या महापुरुषांच्या यादीत साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे तसेच क्रांतिगुरू उस्ताद लहुजी साळवे यांची नावे नसल्याचा दावा केला.

या दाव्याची पडताळणी केली असता, माजी आमदार सुधाकर भालेराव यांनी जानेवारी २०२२ मध्ये केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता विभागाकडे महापुरुषांच्या यादीबाबत माहिती मागविण्यासाठी पत्र पाठविल्याचे समोर आले. त्यास उत्तर म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन, नवी दिल्ली यांनी दिलेल्या लेखी पत्रात संबंधित यादीत डॉ. अण्णाभाऊ साठे आणि उस्ताद लहुजी साळवे यांची नावे नसल्याचे नमूद असल्याचा दावा करण्यात आला आहे. उल्लेखनीय म्हणजे, हा पत्रव्यवहार जानेवारी २०२२ मधील असून त्या काळात केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टीचे सरकार कार्यरत होते. या पत्रव्यवहारामुळे विविध सामाजिक व राजकीय स्तरावर चर्चा सुरू झाली असून, संबंधित यादीचे स्वरूप, तिचा उद्देश आणि त्यामध्ये महापुरुषांचा समावेश कोणत्या निकषांवर करण्यात आला होता, याबाबत केंद्र सरकार किंवा संबंधित विभागाकडून अधिकृत स्पष्टीकरणाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## लातूर जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी खरेदीसाठी १७ जुलै २०२६ पर्यंत दरपत्रके सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा माहिती कार्यालय, येथील वृत्तपत्रांची व मासिकांची रद्दी विक्री करण्यात येणार आहे.यासाठी नोंदणीकृत रद्दी खरेदीदारांनी आपली दरपत्रके दि. १७ जुलै २०२६ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इच्छूक रद्दी खरेदीदारांनी आपले दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालयात मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, उत्तर बाजू, लातूर या पत्यावर १७ जुलै २०२६ दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत, कार्यालयीन वेळेत रद्दी पाहावयास मिळेल.

रद्दी खरेदीदाराकडे इलेक्ट्रॉनिक वजन काटा असणे आवश्यक आहे. या संदर्भातील अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहता येतील, दरपत्रकात वृत्तपत्र रद्दी, मासिके रद्दी व पेपर गोळा यांचे स्वतंत्र्य दर नमूद करावेत, रद्दी विक्रीचे दरपत्रक मंजूर करणे अथवा रद्द करणे, तसेच संपुर्ण रद्दी विक्री प्रक्रीया रद्द करण्याचे सर्व अधिकारी जिल्हा माहिती कार्यालय, लातूर यांना राहतील असे, लातूर जिल्हा माहिती कार्यालयायामार्फत कळविण्यात आले आहे.

## महापौरांशी गैरवर्तन प्रकरणी वैद्यकीय अधिकाऱ्याची सेवा खंडित; आयुक्त राहुल कुलकर्णी यांची तातडीची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुष्मान आरोग्य मंदिर, अवंतीनगर येथे महापौरांच्या पाहणीदरम्यान झालेल्या कथित गैरवर्तनाची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त तथा भा.प्र.से. अधिकारी राहुल कुलकर्णी यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षाराणी कंधारे यांची सेवा तात्काळ खंडित करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच त्यांचा पुनर्नियुक्तीचा प्रस्तावही फेटाळण्यात आला आहे.



९ जुलै २०२६ रोजी महापौरांनी आयुष्मान आरोग्य मंदिराला भेट दिली असता, उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्यांच्याशी गैरवर्तन झाल्याचे निदर्शनास आल्याचे आयुक्तांनी जारी केलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. ही बाब गंभीर स्वरूपाची असून शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असल्याने संबंधित अधिकाऱ्याची सेवा खंडित करण्यात येत असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. व्हिडिओमध्ये महापौर आणि वैद्यकीय अधिकारी यांच्यात शाब्दिक वाद झाल्याचे दिसत असून, या घटनेवर नागरिकांमध्ये विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

संविधानिक पदावरील लोकप्रतिनिधींशी संवाद साधताना शासकीय अधिकाऱ्यांनी शिष्टाचार, संयम आणि प्रशासकीय मर्यादा पाळणे अपेक्षित असते. मतभेद असले तरी संवादाची पातळी आणि अधिकृत वर्तन कायम राखणे ही सार्वजनिक सेवेची मूलभूत जबाबदारी मानली जाते.

दरम्यान, आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी केलेल्या तातडीच्या कारवाईमुळे या प्रकरणाची शहरात जोरदार चर्चा सुरू झाली असून, महापालिका प्रशासनाने शिस्तीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश दिल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

## लातूरमध्ये मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यामध्ये मतदारयादी अद्ययावत करण्यासाठी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग करणे आवश्यक असून, जर मतदारांचे मॅपिंग झाले नाही तर त्यांना सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या वेळी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोरील सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. या कामासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी व पर्यवेक्षकांना ०१ जुलै २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत पूर्णवेळ कामाकरिता कार्यमुक्त केले असून, अस्पष्ट फोटो गोळा करून अद्ययावत करणे व डीएसई नोंदींची पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत.

या विशेष मोहिमेअंतर्गत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदारांच्या घरोघरी भेट देऊन माहिती संकलन आणि डिजिटायझेशनची कामे पूर्ण करणार आहेत. मतदारांना या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी सर्व बीएलओ रोज संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत आपापल्या मतदान केंद्रांवर उपस्थित राहणार आहेत. या महत्त्वाकांक्षी मोहिमेचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, त्यानुसार २० जून २०२६ ते २९ जून २०२६ या कालावधीत बीएलओ प्रशिक्षण व मतदार यादी छपाईचे काम पूर्ण झाले आहे. यानंतर ०५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली जाईल आणि त्यानंतर ०५ ऑगस्ट २०२६ ते दि. ०४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना आपले दावे व हरकती दाखल करता येतील. हे प्राप्त झालेले दावे व हरकती ०५ ऑगस्ट २०२६ ते ०३ ऑक्टोबर २०२६ या नोटीस टप्प्यात निकाली काढले जातील. ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाईल. या मोहिमेत जास्तीत जास्त पात्र नागरिकांची नाव नोंदणी व्हावी आणि मतदार यादी अचूक व्हावी, यासाठी सर्व मतदारांनी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत आपल्या मतदान केंद्रावर जाऊन बीएलओ यांची भेट घ्यावी आणि मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## पत्रकार संघाचे नरसिंह घोणे यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संकल्प

### 'प्लास्टिकला नकार, कापडी पिशवीचा स्वीकार'चा संदेश, गोलाई येथे नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप; प्लास्टिकमुक्त भारतासाठी जनजागृती अभियान

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार तथा समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व मा. श्री. नरसिंह घोणे यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. ''आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी'' या अभियानाच्या वतीने लातूर शहरातील गोलाई परिसरात भाजीपाला खरेदीसाठी आलेल्या नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.




सध्या वाढत चाललेल्या प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणावर होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन ''प्लास्टिकमुक्त भारत'' या संकल्पनेला चालना देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला. नागरिकांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर टाळून पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचा वापर करण्याचा संकल्प केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्लास्टिकमुळे होणाऱ्या पर्यावरणीय हानीबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले. प्लास्टिकमुळे जलस्रोतांचे प्रदूषण, जनावरांना होणारा धोका तसेच मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्यात आली. प्रत्येक नागरिकाने बाजारात जाताना स्वतः सोबत कापडी पिशवी बाळगावी आणि प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळावा, असे आवाहन करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात केली, तरच ''प्लास्टिकमुक्त लातूर, प्लास्टिकमुक्त महाराष्ट्र आणि प्लास्टिकमुक्त भारत'' हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

''आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी'' या अभियानाच्या माध्यमातून आरोग्य जनजागृती, पर्यावरण संरक्षण, व्यसनमुक्ती, नियमित व्यायाम आणि सामाजिक बांधिलकीचे विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास दत्तात्रय परळकर, शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, संतोष सोनवणे, राम रोडगे, वीरभद्र तरगुडे, संजय राजुळे आदींची उपस्थिती होती. उपस्थितांनी नागरिकांशी संवाद साधून प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्यांचा नियमित वापर करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी ''चला, प्लास्टिकला नकार देऊया... कापडी पिशवीचा स्वीकार करूया... पर्यावरण वाचवूया!'' असा संदेश देत नागरिकांनी पर्यावरण रक्षणाच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार केला.



## संपादकीय...

### उपवर्गीकरणाच्या वादात भाषा जपा; महापुरुषांचा अपमान करून समाजाचे नुकसान करू नका

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर महाराष्ट्रात वातावरण दिवसेंदिवस तापत आहे. विविध समाजघटक आपापली भूमिका ठामपणे मांडत आहेत. लोकशाहीत मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र हे मतभेद व्यक्त करताना भाषेची मर्यादा ओलांडली जात असेल, तर तो समाजासाठी धोक्याचा इशारा आहे. विशेषतः महार आणि मांग समाजातील काही व्यक्तींकडून सोशल मीडियावर आणि सार्वजनिक व्यासपीठांवर वापरली जाणारी आक्षेपार्ह भाषा चिंतेचा विषय ठरत आहे. काही व्यक्तींच्या वक्तव्यांमुळे संपूर्ण समाजाला दोष देणे योग्य नाही, परंतु अशा घटनांकडे दुर्लक्षही करता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा संदेश दिला. त्याचप्रमाणे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, क्रांतिगुरू उस्ताद लहुजी साळवे, संत चोखामेळा, माता रमाई आणि इतर अनेक महापुरुषांनी समाजजागृती व सामाजिक परिवर्तनासाठी मोठे योगदान दिले आहे. अशा महापुरुषांविषयी अपशब्द वापरणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा अपमान होय. कोणताही समाज आपल्या महापुरुषांचा अवमान सहन करू शकत नाही. उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर कायदेशीर आणि घटनात्मक प्रक्रिया सुरू आहे. सर्वोच्च न्यायालय, केंद्र व राज्य सरकारे आणि विविध सामाजिक संघटना आपापली भूमिका मांडत आहेत. त्यामुळे हा वाद कायद्याच्या चौकटीतच सोडवला गेला पाहिजे. सोशल मीडियावरील भावनिक पोस्ट, चिथावणीखोर भाषा आणि अपमानास्पद टिप्पणी समाजातील दरी अधिक वाढवतात. त्यातून संवाद होत नाही; उलट अविश्र्वास आणि द्वेष वाढतो. महापुरुषांची तुलना करणे, त्यांच्यावर टीका करण्याच्या नावाखाली अवमानकारक भाषा वापरणे किंवा जातीवाचक टिप्पणी करणे कोणत्याही दृष्टिकोनातून योग्य नाही. विचारांवर चर्चा होऊ शकते, पण व्यक्तिमत्त्वाचा अवमान लोकशाही मान्य करत नाही.आज काही मोजक्या व्यक्तींच्या बेफिकीर वक्तव्यांमुळे दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. अशा प्रवृत्तींना समाजानेच नाकारले पाहिजे. महार आणि मांग समाजाचा संघर्षाचा इतिहास वेगळा असला तरी अन्यायाविरुद्धच्या लढ्यात दोन्ही समाजांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे परस्पर वैर निर्माण करणे ही इतिहासाशी प्रतारणा ठरेल. समाजात मतभेद असू शकतात; पण मनभेद निर्माण होऊ नयेत. कोणत्याही आंदोलनाचे यश हे संयम, शिस्त आणि सभ्य भाषेवर अवलंबून असते.आज गरज आहे ती एकमेकांच्या भावना समजून घेण्याची. कोणत्याही समाजाच्या श्रद्धास्थानावर आघात केल्यास त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. राजकीय किंवा सामाजिक स्वार्थासाठी समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपासून सावध राहणे आवश्यक आहे. भडकाऊ विधानांचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांनाच बसतो. प्रत्येकसमाजानेआपल्यातरुणपिढीलासंविधानिक मूल्ये, सामाजिक सलोखा आणि परस्पर सन्मान यांचे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. महापुरुषांनी आयुष्यभर समाजाला जोडण्याचे काम केले. त्यांच्या नावावर समाज तोडण्याचा प्रयत्न करणे, त्यांच्या विचारांनाच हरताळ फासणारे आहे.उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर कोणाची भूमिका योग्य किंवा अयोग्य, याचा निर्णय न्यायालयीन व घटनात्मक प्रक्रियेतून होईल. पण तोपर्यंत समाजाने संयम गमावू नये. भाऊ-भावांमध्ये वैर निर्माण करणारी भाषा कोणाच्याही हिताची नाही. सामाजिक सलोखा तुटला तर त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागते.मतभेद ठेवा, पण मनात द्वेष ठेवू नका. भूमिका मांडा, पण महापुरुषांचा अपमान करू नका. आंदोलन करा, पण कायद्याच्या चौकटीत राहून करा. आजची खरी गरज संघर्षाची नाही, तर संवादाची आहे. संविधानाने दिलेल्या बंधुतेच्या तत्त्वाला स्वीकारून सर्व समाजघटकांनी परस्पर सन्मानाने वागावे, हीच या वादातून घेण्यासारखी सर्वात मोठी शिकवण आहे.

# रमाबाई पुतळा विटंबना आणि हत्याकांडाचे काय झाले?

महाराष्ट्रसह देशभरात ऐतिहासिक आंबेडकरी चळवळीचे मुख्य केंद्र असलेल दादर येथील प्रसिद्ध आंबेडकर भवन पाडल्याचे प्रतिसाद,प्रतिवाद गाजले. १६ जुलै २०१६ ला भर पाऊसात प्रचंड मोर्चा निघाला.त्यामुळे आम्ही मागील घडलेल्या लक्षवेधी घटना विसरून पुन्हा पुन्हा तेच तेच गल्ली बोळातील आंदोलनवर आपली पूर्ण शक्ति खर्च करतो,आणि आपली दुकानदारी कायम ठेवतो. अहमदनगर जिल्हात दलित बौद्ध अन्याय अत्याचार च्या विरोधात आक्रोश मोर्चा काढल्यामुळे खुप गाजला होता.

अहमदनगर जिल्ह्यात ज्या दलित बौद्ध तरुणाच्या हत्या झाल्या त्याबाबत जिल्ह्यातील आंबेडकरी संघटना पक्ष सोडल्यास कोणाला ही वाईट वाटले नाही. पण प्रचंड आक्रोश मोर्चा काढल्यामुळे जातीवादी मानसिकता असलेल्या त्याच्यातील सैतान (माणूस ) जागी झाला ?. देशातील कोणताही कायदा त्यांना लागू होत नसल्या सारखा रात्री मोर्चा कडून घटनाकाराला बाबत प्रचंड गरड ओकली.नेमके सध्या महाराष्ट्रात युतीचे सरकार सत्तेवर असल्यामुळे त्यावर योग्य कडक करवाई झाली नाही. तसाच प्रकार ऐतिहासिक आंबेडकर भवन रात्री २ / ३ वाजता स्वयं घोषित ट्रस्टी ने पडून त्यावर योग्य कडक कायदेशीर करवाई होत नाही.

ज्या रमाबाई नगरातल्या हत्याकांडा नंतर राज्यातील दलित समाजाने युती सरकारला जातीयवादी ठरवलं होत आणि पुढच्याच विधानसभा निवडणुकीत घरचा रस्ता दाखवला होता.पण युतीच्या पाठोपाठ सत्तेवर आलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारने ही दलितांच्या तोंडाला पाने पुसली होती.हे विसरता येत नाही.

मनोहर कदम सारखा जातीवादी अधिकारी पोलीस दलात ठेवणं धोकादायक असल्याचा अभिप्राय आपल्या चौकशी अहवालात देणाऱ्या गुंडेवार आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी करण्याचं आश्र्वासन काँग्रेस आघाडीने तेव्हाच्या विधानसभा निवडणुकांपूर्वी दिलं होतं. शिवाय, मनोहर कदम याच्यामुळे रमाबाई नगरात झालेला गोळीबार आणि पोलिसांच्या बळाचा अतिरेकी वापर अनाठायी होता, असा ठपका ही आयोगाने ठेवला होता.

असं असतानाही राज्य सरकारने त्याच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यास तब्बल चार वर्ष लावली. या संपूर्ण काळात विविध दलित संघटना आणि दलित कार्यकर्त्यांनी केलेल्या मागणीमुळे अखेर २० डिसेंबर २००२ रोजी कदम याला अटक करण्यात आली. पण कदमने मात्र कोठडी टाळण्यासाठी आजारी असल्याचं सांगत रूग्णालयात अटकेचे दिवस काढले. कारण युती असो या आघाडी दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे शिर्डीत विखे पाटलानी विरोधीपक्ष नेता असताना दाखवून दिले.



**रमाबाई हत्त्याकांडाला २९ वर्ष पूर्ण झाली परंतु आजही रमाबाई नगर न्यायाच्या प्रतिक्षेत**

रमाबाई नगर येथी हात्याकांडाला आज **२९** वर्ष पूर्ण झाली. ११ जुलै १९९७ रोजी हे हात्याकांड घडल होत. त्याचे पडसाद आजही घाटकोपर येथील रमाबाई नगरमध्ये दिसुन येतात. यामध्ये पोलीस अधिकारी PSI मनोहर कदम यांनी...

विशेष म्हणजे,या संपूर्ण प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी कदम पोलीस गणवेषात न्यायालयात हजर होत असे. त्याच्या या कृतीमुळे साक्षीदारांवर दडपण येत असल्याचा आरोप करत त्याच्या निलंबनासाठी गजानन लासूरे आणि अनिकेत देशकर या दोघा वकिलांनी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. ती न्यायालयाने मंजूर केली.

गंभीर गुन्ह्याचा खटला सुरु असलेला पोलीस अधिकारी गणवेषात आणि सेवेत असल्यास लोकांचा फौजदारी न्याय प्रक्रियेवरील विश्र्वास उडेल, हे याचिकाकर्त्यांचं म्हणणं न्यायालयाने मान्य केलं होत. पण खटल्याला होत असलेल्या विलंबामुळे रमाबाई नगरवासीयांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्र्वास उडाला होता.

११ जुलै १९९७ ला जातीवादी हरामखोर राज्य राखीव दलाचा पोलीस फौजदार मनोहर कदम याने भ्याडपणे गोळीबार केला. या गोळीबरात सुखदेव कापडणे, संजय निकम,बबलू वर्मा, अनिल गरुड, किशोर कटारनवर, संजय कांबळे, विलास दोडके, मंगेश शिवसरने, अमन धनावडे, कौसल्या पाठारे असे १० जण शहीद झाले होते तर २३ जण जखमी झाले होते.आज (११ जुलै) रमाबाई नगर, मुंबई हत्याकांडाचा २९ वा स्मृतिदिन आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळा दिवस म्हणून रमाबाई नगर हत्याकांडाची नोंद झाली आहे. भिमसैनिकांवरील जातीवाद्यांचा व पोलिसी बळाचा वापर करून झालेला हल्ला भिमसैनिकांवरील अत्याचाराच्या घटनेत अतिशय निंदनीय होता. स्वतंत्र भारतात वावरणाऱ्या जातीयवादी षंढ प्रवृत्तींचा आंबेडकरी समाजावरचा द्वेष जगासमोर आणणारी ही घटना होती.या हत्याकांडात अनेक भीमसैनिकांना, माया बहिणींना, आबाल वृद्धांना आणि लहान लहान भीमसैनिकांना पोलिसाच्या अत्याचाराचे शिकार होऊन शहीद व्हावे लागले होते. त्यामुळे भिमसैनिकांसाठी ११ जुलै हा काळा दिवस आहे.

रामबाई हत्याकांडा नंतर अनेक जनांदोलन झाली.नामांतर साठी १६ वर्ष संघर्ष झाला.खैरलांजी ते,जवखेडा, खर्डा, सोनई,शिर्डी अहमदनगर जिल्हा राज्यातील दलित बौद्ध समाजा करिता जातीवादी मानसिकता असलेल्या सैताना चा उगमस्थान झाला होता.रमाबाई हत्याकांडा पासून शिर्डीच्या हत्याकांडा पर्यंत सर्व आंबेडकरी संघटना राज्यात तालुखा जिल्ह्यात आपसातील मतभेद विसरून जनांदोलन करताना पोलीस स्टेशन वर सनद शीर मार्गाने नोंद करतात.पण न्यायलाया कडून न्याय मिले पर्यंत सर्व पुरावे नष्ट केल्या जातात.आणि मुख्य आरोपी पुराव्या अभावी सही सलामत सुटत आले आहेत.मग आमची तरुण मुले विचारतात बाबा रमाबाई नगरातील हत्याकांडाचे काय झाले?.आणि पुतळा विटंबना करणारा कोण होता तो पकडला काय?. त्याचा मुख्य सूत्रधार कोण होता?. त्यांचे काय झाले.रमाबाई हत्याकांडा करिता ज्यांनी ज्यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले.तेच मुख्य आरोपी झाले.त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना केली तो आणि त्याचा मुख्य सूत्रधार कधीच समोर आला नाही.जनआंदोलन करणारे कार्यकर्ते आणि नेते नंतर स्वता पोलीस कोर्टाचे चक्कर काढुन हैराण झाले मानसिक शारीरिक व आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे ढासळले आणि नाईलाजाने काही काँग्रेसवासी झाले. त्यामुळे ते ना आंबेडकरी समाजाचे राहिले ना रिपाईचे.



आज रमाबाई नगर घाटकोपरचा फेर फटका मारल्यास हेच का ते रमाबाई नगर असा प्रश्र्न पडतो. रमाबाई नगरातील ४५ मंडळा च्या तरुण कार्यकर्त्यांना भेटा आणि एकच प्रश्र्न विचारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना करणारा भेटला काय?. आणि गोळीबार करणाऱ्या मनोहर कदमचे काय झाले?. रामबाई नगरातील गोळीबारत निरपराध भिमसैनिक मारल्या गेले.त्या शहीदाना विनम्र अभिवादन करण्या शिवाय आपल्याला पर्याय नाही.कारण ज्यांनी रमाबाई हत्याकांड ज्यांच्या आशीर्वादाने मनोहर कदम यांने घडविले त्याचेच सरकार आज आहे.आणि दुःखाची बाब ही की ज्या नेत्याने समाजा कडून गुरा सारखा मार खल्ला तोच मान्यताप्राप्त नेता आज त्याच्या मांडीला मांडी लावून केंद्रात सामाजिक न्याय मंत्री आहे.आजची तरुणानी व विद्यार्थ्यानी विचारले रमाबाई कॉलनी तील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची विटंबना कोणी केली होती?. त्याचा आरोपी एवढी मोठी जन आंदोलन करून पोलिस का पकडू शकले नाही.

रमाबाई ते शिर्डी हत्याकाड घडविणारे राजकीय जात दांडगे धन दांडगे आता सर्वच पक्षात भाऊ भाऊ बनून वाटून खात आहेत. आणि आपण मात्र नवीन नवीन गट निर्माण करण्यावर भर देतो.बंद करा ती गटबाजी सर्वांनी एक व्हा भीमाचे लेक व्हा. येणार काल आजच्या पिढीला माफ करणार नाही. उद्या नातू पणतू विचारतील बाबा,आबा.. रमाबाई पुतळा विटंबना आणि हत्याकांडाचे काय झाले?. शहीदाना मनापासून भावपूर्ण श्रद्धांजली व्हा.

**सागर रामभाऊ तायडे**
**भांडूप मुंबई**
**-९९२०४०३८५९**




# 'ऑपरेशन टायगर' आणि पक्षांतर बंदी कायदा: 'लोकशाही संकटात'

भारताच्या संविधानाने स्वीकारलेली संसदीय लोकशाही ही केवळ एक शासन पद्धती नसून ती लोककल्याण, सामाजिक न्याय आणि नैतिक मूल्यांवर अधिष्ठित असलेली एक जिवंत व्यवस्था आहे. अब्राहम लिंकन यांच्या 'लोकांनी, लोकासांठी, लोकांद्वारे चालवलेले राज्य' या लोकशाहीच्या वैश्र्विक व्याख्येला भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मानवहित आणि सामाजिक समता' जोडत अधिक व्यापक केले. परंतु, आताच्या भारतीय राजकारणाचे निरीक्षण केल्यास, सिद्धांतातील लोकशाही आणि व्यवहारातील राजकारण यांमध्ये एक फार मोठी दरी निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसते. 'ऑपरेशन कमळ' किंवा 'ऑपरेशन टायगर' सारख्या संज्ञा जेव्हा राजकीय पटलावर उघडपणे वापरल्या जातात, तेव्हा ते केवळ सत्तेचे हस्तांतरण नसते, तर तो संविधानाचा संकोच, राजकीय नैतिकतेचा संहार आणि जनमताचा उघड अपमान असतो. एक राज्यशास्त्राचा अभ्यासक आणि तटस्थ विश्र्लेषक म्हणून, या घटनांकडे केवळ सत्तासंघर्ष म्हणून न पाहता, संविधानाचा मूळ ढाचा, संस्थांची स्वायत्तता आणि लोकशाहीची नैतिकता या त्रिसूत्रीच्या आधारे पाहणे आज अनिवार्य बनले आहे.

आताच्या राजकारणात 'ऑपरेशन टायगर' ही संकल्पना लोकनियुक्त सरकारे पाडण्यासाठी आणि राजकीय पक्षांमध्ये कृत्रिम फूट पाडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या छुप्या, संघटित आणि अफाट संसाधनांनी युक्त अशा मोहिमांचे प्रतीक बनली आहे. राज्यशास्त्राच्या सिद्धांतानुसार, लोकशाहीत सत्तेचे परिवर्तन हे निवडणुकांच्या माध्यमातून आणि मतदारांच्या इच्छेनुसार होणे अभिप्रेत आहे. परंतु, 'ऑपरेशन्स'च्या या नव्या युगात संविधानाने दिलेल्या स्वायत्त संस्था, केंद्रीय तपास यंत्रणा, अफाट आर्थिक बळ आणि सत्तेचा गैरवापर करून लोकप्रतिनिधींचे मतपरिवर्तन केले जाते. रातोरात आमदारांना चार्टर्ड विमानाने दुसऱ्या राज्यात नेणे, पंचतारांकित हॉटेल्समध्ये त्यांची बडदास्त ठेवणे आणि बहुमताचे आकडे गोळा होईपर्यंत त्यांना एका प्रकारे डांबून ठेवणे, हे चित्र जागतिक पातळीवर भारताच्या लोकशाही प्रतिमेला तडे देणारे आहे. हा प्रकार केवळ राजकीय पक्षांमधील स्पर्धा नसून, तो संविधानाने प्रस्थापित केलेल्या 'चेक्स अँड बॅलन्सेस' (नियंत्रण आणि समतोल) या तत्त्वाचा उघड पराभव आहे. जेव्हा कायदेमंडळातील संख्याबळ हे लोकभावनेपेक्षा 'संसाधनांच्या' बळावर ठरते, तेव्हा लोकशाहीचे रूपांतर 'धनिकशाहीत' (Plutocracy) होऊ लागते.

भारतीय राजकारणातील पक्षांतराचा आजार नवा नाही. संसदेच्या सुरुवातीच्या दशकांमध्ये प्रस्थापित झालेली एक-पक्षीय वर्चस्वाची पद्धती (One-Party Dominance System) जेव्हा १९६७ च्या निवडणुकीत मोडकळीस आली, तेव्हा प्रादेशिक पक्षांचा उदय झाला आणि तिथूनच अस्थिरतेचे पर्व सुरू झाले. १९६७ मध्ये हरियाणातील आमदार गयालाल यांनी अवघ्या १५ तासांत तीन वेळा पक्ष बदलला. या ऐतिहासिक घटनेतूनच भारतीय राजकारणाला 'आया राम, गया राम' हा कलंकित शब्दप्रयोग मिळाला.१९६७ ते १९८३ या काळात देशात हजारो पक्षांतरे झाली. निव्वळ मंत्रीपद, सत्ता आणि आर्थिक लाभासाठी लोकप्रतिनिधी सकाळी एका पक्षात आणि संध्याकाळी दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असत. या राजकीय अनैतिकतेमुळे अनेक राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करावी लागली. सरकारांचे आयुष्य काही महिन्यांचे किंवा दिवसांचे उरले होते. या अस्थिरतेमुळे प्रशासनाचा बोजवारा उडाला आणि सामान्य नागरिकांचे हित पूर्णपणे दुर्लक्षित झाले. राजकीय व्यवस्थेतील हाच नैतिक सडत चाललेला भाग रोखण्यासाठी संविधानात कायदेशीर हस्तक्षेप करणे भाग पडले.

राजकीय अस्थिरतेला कायदेशीर चाप लावण्यासाठी १९८५ मध्ये ५२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली आणि संविधानात '१० वे परिशिष्ट' (10th Schedule) समाविष्ट करून 'पक्षांतर बंदी कायदा' लागू करण्यात आला. या कायद्याचा मूळ उद्देश लोकप्रतिनिधींना पक्षाशी आणि मतदारांशी प्रामाणिक राहण्यास भाग पाडणे हा होता. सुरुवातीला पक्षातील १/३ सदस्यांनी वेगळा गट स्थापन केल्यास त्याला कायद्याने मान्यता होती. परंतु, या सवलतीचा गैरवापर होऊ लागल्याने, २००३ मध्ये ९१ व्या घटनादुरुस्तीद्वारे ही अट २/३ सदस्य अशी कडक करण्यात आली.परंतु, राज्यशास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास, हा कायदा मूळ आजारावर उपाय करण्याऐवजी पळवाटांचे केंद्र बनला आहे. 'ऑपरेशन टायगर' सारख्या आधुनिक मोहिमांमध्ये याचे जिवंत उदाहरण पाहायला मिळते. जेव्हा एखाद्या पक्षाचे '९ पैकी ६ आमदार' एका रात्रीत फुटतात, तेव्हा ते केवळ पक्षांतर नसते तर तो कायद्यातील २/३ (दोन-तृतीयंश) या अटीचा अत्यंत हुशारीने केलेला गैरवापर असतो. पूर्वी 'वैयक्तिक पक्षांतर' होत असे, तर आता या कायद्याच्या संरक्षणाखाली असे 'घाऊक पक्षांतर' (Wholesale Defection) केले जाते. ९ पैकी ६ आमदारांचा आकडा गाठून मूळ पक्षावरच हक्क सांगण्याची नवी पद्धत रूढ झाली आहे.यात सर्वात दुर्दैवी भूमिका ही विधानसभा अध्यक्षांची राहिलेली आहे. अध्यक्ष हे एका विशिष्ट राजकीय पक्षाचे असतात. कायद्यानुसार त्यांना 'अर्ध-न्यायिक' अधिकार दिलेले असतानाही, अनेकदा त्यांच्याकडून राजकीय पूर्वग्रहातून निर्णय घेतले जातात किंवा निर्णय घेण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई केली जाते. परिणामी, जो कायदा पक्षांतर रोखण्यासाठी ढाल बनणार होता, तोच कायदा आता ९ पैकी ६ आमदार फोडणाऱ्या राजकीय फुटीला घटनात्मक वैधता देण्याचे साधन बनला आहे.

लोकशाहीचा पाया 'सोशल कॉन्ट्रॅक्ट' (सामाजिक करार) या तत्त्वावर आधारलेला आहे. मतदार जेव्हा मतदान करतो, तेव्हा तो केवळ एका व्यक्तीला मत देत नाही, तर तो त्या उमेदवाराच्या पक्षाला, त्याच्या जाहीरनाम्याला आणि त्याच्या विचारसरणीला आपले मत समर्पित करतो. परंतु, जेव्हा एखादा निवडून आलेला लोकप्रतिनिधी वैयक्तिक स्वार्थासाठी पक्षांतर करतो, तेव्हा तो त्या लाखो मतदारांच्या सामूहिक इच्छेचा, राजकीय निष्ठेचा आणि विश्वासाचा उघडपणे लिलाव करत असतो.राजकीय अनैतिकतेच्या या वातावरणामुळे मतदारांमध्ये एक प्रकारची राजकीय उदासीनता आणि नैराश्य निर्माण होत आहे. आपण कोणालाही मत दिले, तरी शेवटी सत्तेचे गणित रिसॉर्ट्स आणि पैशांच्या जोरावरच ठरणार आहे, ही सर्वसामान्यांची भावना लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

लोकशाहीत मतदाराचा विश्वास उडाला, की त्या व्यवस्थेची वैधता संपुष्टात येते. निष्ठा, तत्त्वे आणि विचारधारा यांचे अस्तित्वच संपुष्टात आणणारे हे राजकारण नैतिकतेच्या सर्व कसोट्यांवर अपयशी ठरले आहे. जेव्हा देशातील कायदेमंडळ (संसद) आणि अंमलबजावणी करणारी यंत्रणा संविधानाच्या रक्षणात अपयशी ठरतात, तेव्हा जनतेची शेवटची आशा 'न्यायव्यवस्था' असते. सध्याच्या राजकीय परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून किंवा दाखल झालेल्या जनहित याचिकांवर (PIL) अत्यंत गतिमानतेने, कायदेशीर कसोटीवर आणि कठोरतेने निर्णय घेणे आवश्यक आहे.अनेकदा पक्षांतराचे खटले न्यायालयात वर्षानुवर्षे रेंगाळतात, तोपर्यंत संबंधित सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करते. यामुळे मिळणाऱ्या न्यायाला काही अर्थ उरत नाही. Justice delayed is justice denied (उशिरा मिळालेला न्याय हा अन्यायच असतो) हा नियम येथे तंतोतंत लागू होतो. सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या 'मूलभूत ढाच्याचे' (Basic Structure) रक्षण करण्यासाठी या विषयाचे गांभीर्य ओळखून, पक्षांतराच्या प्रकरणांवर निकाल देण्यासाठी 'कालबद्ध मर्यादा' (Time-bound limit) निश्चित केली पाहिजे. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी न्यायव्यवस्थेने आक्रमक भूमिका घेणे ही काळाची गरज आहे.

राजकीय सिद्धांतानुसार, कोणत्याही शासनाचे अंतिम ध्येय हे 'मानवहित' (Human Welfare) आणि 'कल्याणकारी राज्य' हेच असायला हवे. परंतु, जेव्हा संपूर्ण राजकीय व्यवस्था केवळ सत्ता टिकवणे आणि सत्ता मिळवणे या चक्रात अडकते, तेव्हा जनतेचे आरोग्य, शिक्षण, रोजगार, शेती आणि पायाभूत सुविधा यांसारखे मूलभूत प्रश्र्न पूर्णपणे बाजूला पडतात. नोकरशाही सैरभैर होते आणि सुशासनाचा (Good Governance) अंत होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि मानवी हिताचे रक्षण करण्यासाठी पक्षांतर बंदी कायद्यात खालील कडक आणि तातडीच्या सुधारणा करणे गरजेचे आहे.२/३ ची कायदेशीर सवलत पूर्णपणे रद्द व्हावी: पक्षातील फूट कितीही मोठी असली, तरी ज्या लोकप्रतिनिधीने मूळ पक्षाच्या चिन्हावर निवडणूक जिंकली आहे, त्याने पक्ष सोडल्यास त्याचे सदस्यत्व त्याच क्षणी रद्द झाले पाहिजे. पक्षांतराला कोणतीही कायदेशीर पळवाट असू नये. निवडणुकीवर आणि पदांवर दीर्घकालीन बंदी: पक्ष बदलणाऱ्या लोकप्रतिनिधीला पुढील ५ वर्षांसाठी कोणतीही निवडणूक लढवण्यास आणि कोणतेही सरकारी लाभ किंवा मंत्रीपद भोगण्यास कायदेशीर बंदी असावी.तटस्थ न्यायाधिकरणाची (Tribunal) स्थापना: पक्षांतराचा निर्णय घेण्याचे अधिकार विधानसभा अध्यक्षांऐवजी निवडणूक आयोग आणि निवृत्त न्यायाधीशांचा समावेश असलेल्या एका 'स्वतंत्र आणि तटस्थ न्यायाधिकरणाकडे' सोपवावे, जेणेकरून राजकीय पक्षपातीपणाला जागा उरणार नाही.पक्षीय निष्ठा आणि 'व्हिप' (Whip) चा मर्यादित वापर: पक्षाच्या आदेशाचा (Whip) वापर केवळ सरकारचे अस्तित्व धोक्यात असताना (उदा. अविश्वास ठराव) याच वेळी बंधनकारक असावा. इतर सामान्य आणि जनकल्याणकारी विधेयकांवर लोकप्रतिनिधीला आपल्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार मत देण्याचे स्वातंत्र्य असावे, ज्यामुळे पक्षांतर्गत लोकशाही टिकून राहील.



ऑपरेशन टायगर' सारखे छुपे खेळ संविधानाचा आणि लोकशाहीचा गळा घोटणारे आहेत. राजकारणातील नैतिकतेचा आणि निष्ठेचा पूर्णपणे अंत झाला असून, सत्ता हेच अंतिम साध्य बनले आहे.जर आपण आताच याविरुद्ध कायदेशीर आणि सामाजिक स्तरावर आवाज उठवला नाही, तर 'लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य' ही व्याख्या बदलून 'पैशांनी, पैशांच्या जोरावर चालवलेले राज्य' अशी होईल. पक्षांतर बंदी कायद्यात अधिक कडक सुधारणा करण्याची आणि लोकशाहीची प्रगल्भता टिकवण्यासाठी राजकीय नैतिकतेची गरज आहे. पक्षांतर बंदी कायद्यातील पळवाटा बुजवून, राजकीय निष्ठा जपून मतदारांच्या पवित्र मताचा आदर राखणे, हेच भारतीय संविधानाला, लोकशाहीला आणि मानवी हिताला जिवंत ठेवण्याचे एकमेव साधन आहे. (टिप:या लेखात कोणत्या पक्षाची बाजू घेतलेली नाही भारतीय संविधान आणि लोकशाही मुल्य यावर तटस्थ लिहिले आहे)

संगीता हत्तीमारे -पालकर
(एम.ए.राज्यशास्त्र)

# प्रबोधनकार अजयकुमार खोब्रागडे यांची बसपाच्या सचिव पदी निवड




**नागपूर/प्रतिनिधी :** बहुजन समाज पार्टी, नागपूर शहर कार्यकारिणीत नव्या नियुक्त्या बहुजन समाज पार्टी, नागपूर शहर कार्यकारिणीत संघटना अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रबोधनकार अजयकुमार खोब्रागडे यांची नागपूर शहर सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. अजय कुमार खोब्रागडे यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून, त्यांच्या प्रबोधनाचा ठसा पुर्ण भारतभर उमटलेला आहे. लय भारी वो आंबेडकर, केला EVM²चा घोटाळा, अभी मैदान मे उतरे हैं यांसारख्या अनेक गाजलेल्या गाण्यांनी रसिकांच्या मनात जागा बनवलेली आहे. अजयकुमार यांनी एम.ए.आंबेडकर थॉट मध्ये ०४ गोल्ड मेडल पटकाविले आहे. संपुर्ण भारतात त्यांची युवा प्रबोधनकार, गायक,कवी, अभिनेता, बिजनेसमैन म्हणुन ओळख आहे. त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वामुळे बहुजन समाज पार्टीची संघटनात्मक ताकद अधिक वाढेल, तसेच पक्षाचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचतील, असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला. नवीन जबाबदारी स्वीकारल्याबद्दल प्रबोधनकार अजय कुमार यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील सामाजिक व संघटनात्मक कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

# जननी आशिष चॅरिटेबल ट्रस्ट मधील अनाथ मुलांना जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने चादर, खाऊ, नवीन गोधड्या,ब्लॅंकेटसची मदत





**डोंबिवली/प्रतिनिधी–** सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य करणारी जनजागृती सेवा संस्था ही सर्वश्रुत आहे.गेल्या पाच वर्षात संस्थेने विविध उपक्रम यशस्वीरीत्या राबविले आहेत.असाच एक स्तुत्य उपक्रम डोंबिवली येथे राबविण्यात आला.जननी आशिष चॅरिटेबल ट्रस्ट अनाथ लहान मुलांचे संगोपन करत आहे.मुले म्हणजे देवाघरची फुले, त्यांच्या सोबत घालविलेला प्रत्येक क्षण आपल्याला शिकवितो कि, जीवन कीती सुंदर आहे.आणि साध्या गोष्टींमध्ये खरा आनंद लपला आहे.त्या मुलांना जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने चादर, नवीन गोधड्या, ब्लँकेटसची मदत करण्यात आली.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या सहखजिनदार श्रुती उरणकर,पुनम कदम चंद्रकला मानकर, निता नेवरेकर, कल्पना पेडणेकर यांचे विशेष सहकार्य लाभले.कार्यक्रमासाठी ट्रस्टच्या संचालिका वंदना पाटील यांचेही मार्गदर्शन लाभले.यावेळी ट्रस्ट च्या पर्यवेक्षक शोभा हंडे, श्वेता भोसले, सुवर्णा लिपारे उपस्थित होत्या.संस्थेच्या सहखजिनदार श्रुती उरणकर यांनी इतर महिला सदस्यांना सोबत घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती जयश्री मोकाशी यांच्याशी जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी दुरध्वनी वरुन संपर्क साधून संस्थेची माहिती जाणून घेतली.जननी आशिष ही संस्था गेली३२वर्षे अनाथ मुलांचे संगोपन आणि दत्तक देऊन पुनर्वसन करते.गेल्या३३वर्षात७००हुन अधिक मुलांचे पुनर्वसन करण्यात संस्था यशस्वी झाली आहे.

# महाराष्ट्र राज्य विकास कर्ज २०२६ ची परतफेड

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वसाधारण माहितीसाठी असे अधिसूचित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसूचना क्र. एलएनएफ-१०.२१/प्र.क्र. २७/अर्थोपाय ०५ ऑगस्ट, २०२१ अनुसार ६.२४% महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२६ अदत्त शिल्लक रकमेची १० ऑगस्ट, २०२६ पर्यंत देय असलेल्या व्याजासह ११ ऑगस्ट, २०२६ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल. ''परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१'' अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर ११ ऑगस्ट, २०२६ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बैंक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

# विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपीच्या अटकेसाठी केज मध्ये भव्य जनआक्रोश मोर्चासह ठिय्या आंदोलन!

## खासदार पुत्रला तात्काळ अटक करुन; मकोका अंतर्गत कारवाई करा– बाळासाहेब सानप

**केज/प्रतिनिधी :** टाकळी येथील विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपीच्या अटकेसाठी काल केज येथे घुले समर्थकांनी जनआक्रोश मोर्चा काढून केज तहसील कार्यालयासमोर रस्त्यावर ठिय्या आंदोलन केले. खासदार पुत्र सौरभ सोनवणेला अटक करुन मकोका कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात यावी अशी मागणी माध्यमांशी बोलताना बाळासाहेब सानप यांनी केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक १० जूलै २०२६ रोजी विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपीच्या अटकेसाठी केज शहरांमध्ये विलास घुले समर्थकांनी आणि समाज बांधवांनी एकत्र येत जनअक्रोश मोर्चा काढून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. खासदार पुत्र सौरभ सोनवणे याला अटक करण्यात यावी, तसेच या प्रकरणातील सर्व आरोपींवर मकोका कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात यावी. यासह इतर मागण्यासंदर्भात जन आक्रोश मोर्चा काढून केज तहसील कार्यालयासमोर केज बीड रोडवर ठिय्या आंदोलन करण्यात आले.










शुक्रवार रोजी ११-३० वाजण्याच्या दरम्यान केज पोलीस ठाण्याच्या समोरून या जन अक्रोश मोर्चाला सुरुवात करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे केज बीड या मुख्य रस्त्यावरून मंगळवार पेठ कॉर्नर ते मंगळवार पेठेतुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ येताच मोर्चाकऱ्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोर्चा परत डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून परत मंगळवार पेठेतुन केज बीड या मुख्य राज्यमहामार्गाने छत्रपती शिवाजी महाराज चौका आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हे आंदोलन पुढे तहसील कार्यालयाच्या समोर आणून ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या मोर्चामध्ये विलास घुले यांच्या पत्नी व त्यांचे बंधू रमेश घुले, ओबीसी नेते नवनाथ (आबा) वाघमारे, बाळासाहेब सानप, सांगवीचे सरपंच संजय केदार, मनसे जिल्हाध्यक्ष सुमंत धस यांच्यासह टाकळी ग्रामस्थ, महिला, केज तालुक्यातील व इतर ठिकाणचे नागरिक सहभागी होते.

यावेळी रमेश घुले यांच्यासह सहभागी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, विलास घुले व त्यांच्या कुटुंबियांना न्याय देण्यात यावा, सर्व आरोपीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी. अशी मागणी प्रसार माध्यमांशी बोलताना केली आहे.

या मोर्चा दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाकडून केज शहरात मोठा तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे असलेल्या पोलीस व्हॅन, आरोग्य विभागाने रुग्नवाहिका देखील छ.शिवाजी महाराज चौकात तैनात करण्यात आली होती. आंदोलन कर्त्यांच्या मागणीचे निवेदन केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्विकारले.

# अहमदपूर येथे १५ जुलै रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर आणि अहमदपूर येथील शिवलिंग शिवाचार्य महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. अहमदपूर येथील नांदेड रोडवर असलेल्या शिवलिंग शिवाचार्य महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत हा मेळावा पार पडणार असून यामध्ये अनेक नामांकित आस्थापना आणि उद्योजक सहभागी होणार आहेत. या रोजगार मेळाव्यात इयत्ता दहावी, बारावी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण, कोणत्याही शाखेचे पदवीधर, पदव्युत्तर पदवीधर, आय.टी.आय. तसेच डिप्लोमा धारक उमेदवारांना रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध असणार आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व सुशिक्षित बेरोजगार व नोकरी इच्छुक उमेदवारांनी या लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे. इच्छुक उमेदवारांनी १५ जुलै रोजी सकाळी १० वाजता स्वतःचा अद्ययावत रिझ्युम किंवा बायोडाटा, सर्व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे आणि पासपोर्ट साईझ फोटो यांच्या किमान तीन प्रतींसह मुलाखतीसाठी वेळेवर उपस्थित राहावे. या मेळाव्या संदर्भात काही अडचण किंवा अधिक माहिती हवी असल्यास उमेदवारांनी कार्यालयीन कर्मचारी दत्तात्रय कांबळे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२३८४६५), लहू भंडारे ( भ्रमणध्वनी क्र. ८०५५९९२९००) किंवा प्रविण वाघमारे (९९२२९२५८९५) यांच्याशी संपर्क साधावा.

# खड्डेमुक्त नाशिकसाठी महापालिकेचा 30 कोटींचा आराखडा

नाशिक : नाशिक शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. नाशिक शहरातील खड्डेमय रस्त्यांमुळे नागरिक त्रस्त असतानाच, महापालिकेने रस्ते दुरुस्ती आणि देखभालीसाठी तब्बल ३० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक डांबरी रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून, वाहतुकीवर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. या पार्श्र्वभूमीवर महापालिकेने अल्पकालीन निविदा प्रक्रिया सुरू केली असून, पुढील पंधरा दिवसांत प्रत्यक्ष दुरुस्तीची कामे सुरू होण्याची शक्यता आहे. शहरातील अत्यंत खराब झालेल्या रस्त्यांना प्राधान्य देऊन दुरुस्ती केली जाणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे. महापालिकेच्या ३१ प्रभागांमध्ये स्वतंत्र निविदा काढण्यात आल्या आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदारांची नियुक्ती करून तातडीने कामाचे आदेश दिले जाणार आहेत..

# प्राचार्या प्रणाली दहाटे यांच्या वाढदिवसानिमित्त– संघर्षातून घडलेले नेतृत्व : शिक्षण, जिद्द आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणादायी यशोगाथा

काही व्यक्ती पदामुळे मोठ्या होतात, तर काही आपल्या कार्यामुळे. काहींना अधिकार प्रतिष्ठा देतो, तर काहींच्या कर्तृत्वामुळे अधिकारालाही प्रतिष्ठा प्राप्त होते. शासकीय सेवेत काम करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याला जबाबदारी मिळते पण त्या जबाबदारीला संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीची जोड देणारे अधिकारीच समाजाच्या स्मरणात राहतात. अशाच कर्तव्यदक्ष, अभ्यासू आणि जिद्दी व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे प्राचार्या प्रणाली हिरामण दहाटे. ११ जुलै हा त्यांचा वाढदिवस, हा दिवस केवळ शुभेच्छांचा नसून एका संघर्षमय प्रवासाचा, शिक्षणाच्या सामर्थ्याचा आणि जिद्दीने घडवलेल्या यशाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

आज त्या महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत भंडारा जिल्ह्यातील साकोली येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या तसेच राजुरा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेल्या संस्थेचे नेतृत्व करताना त्यांनी प्रशासनातील पारदर्शकता, शिस्त, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि गुणवत्तापूर्ण कौशल्य विकास यांचा सुंदर संगम घडवून आणला आहे. परंतु या यशामागे संघर्षाचा दीर्घ इतिहास दडलेला आहे.

अमरावतीच्या एका सर्वसामान्य कुटुंबात त्यांचे बालपण गेले. होली क्रॉस शाळेतून दहावी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी शासकीय पॉलिटेक्निक, अमरावती येथून प्रथम श्रेणीत डिप्लोमा पूर्ण केला. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून अभियांत्रिकी पदवी विशेष प्राविण्यासह संपादन केली आणि पुढे नागपूर येथील जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातून एम.टेक. पूर्ण केले. प्रत्येक टप्प्यावर गुणवत्तेचा ध्यास कायम ठेवत त्यांनी स्वतःची वाट स्वतः निर्माण केली.

त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत साधी होती. वडील राज्य परिवहन महामंडळात बस कंडक्टर म्हणून कार्यरत




होते. चार मुली आणि एका मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी पेलताना आर्थिक मर्यादा स्वाभाविक होत्या. अशा परिस्थितीत शिक्षणाची वाटचाल शक्य झाली ती शिष्यवृत्तीच्या आधारावर. त्या नेहमी कृतज्ञतेने सांगतात की, शिष्यवृत्ती नसती तर कदाचित उच्च शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले नसते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणासाठी निर्माण केलेल्या घटनात्मक संधी आणि सामाजिक न्यायाच्या विचारांबद्दल त्यांना विशेष आदर आहे. वडिलांनी दिलेला सर्वात मोठा वारसा म्हणजे संपत्ती नव्हे, तर जिद्द, प्रामाणिकपणा आणि संकटात न डगमगण्याची ताकद. आयुष्यभर कष्ट करून त्यांनी मुलांना एकच धडा दिला परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षण सोडायचे नाही. हाच धडा पुढे प्रणाली दहाटे यांच्या संपूर्ण आयुष्याचा आधारस्तंभ ठरला.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पॉलिटेक्निकमध्ये व्याख्याता म्हणून अध्यापन सुरू केले. अध्यापनाबरोबरच त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारीही सुरू ठेवली. लग्नानंतर अनेकांची स्वप्ने बदलतात पण त्यांनी स्वप्नांचा पाठलाग सोडला नाही. २०१४ मध्ये त्यांनी शासकीय पॉलिटेक्निक व्याख्याता आणि आयटीआय प्राचार्य पदांच्या परीक्षा दिल्या आणि दोन्ही परीक्षांमध्ये यश मिळवले. मात्र नियतीने त्यांची खरी परीक्षा अजून बाकी ठेवली होती. २०१५ मध्ये व्याख्याता पदाच्या मुलाखतीसाठी त्यांना मुंबईला बोलावण्यात आले. त्या वेळी गर्भारपणाचा आठवा महिना सुरू होता. डॉक्टरांचा सल्ला, घरच्यांची काळजी आणि प्रवासाचा धोका यामुळे त्यांनी मनावर दगड ठेवून आपल्या स्वप्नातील संधीचा त्याग केला. एखाद्याला वाटेल, इतके कष्ट करूनही नशिबाने साथ दिली नाही, पण संघर्षाला घाबरणाऱ्या त्या नव्हत्या.

प्रसूतीनंतर काही दिवसांतच पुन्हा दुसऱ्या मुलाखतीसाठी बोलावणे आले. नुकतीच गंभीर प्रसूती झालेली, अंगात ताप, नीट चालताही येत नव्हते आणि कुशीत अवघे वीस दिवसांचे बाळ. अशा वेळी अनेकांनी आता नको असेच सांगितले असते. परंतु त्यांचे पती त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. त्यांनी धैर्य दिले, विश्र्वास दिला आणि तू हा इंटरव्ह्यू देणारच असा आग्रह धरला. त्या मुंबईला गेल्या, मुलाखत दिली आणि उपस्थित सर्वांना त्यांच्या जिद्दीने प्रभावित केले. निकाल काय लागेल, याची खात्री नव्हती, पण प्रयत्न मात्र अपूर्ण राहिला नाही. काही काळानंतर नियुक्ती आदेश आला आणि त्यांच्या संघर्षाला यशाचे सुंदर बक्षीस मिळाले. त्यांचा मुलगा तेव्हा दोन वर्षांचा झाला होता. त्याचे नाव त्यांनी 'कौतुक' ठेवले, कारण तो त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, आशा आणि यशाचा साक्षीदार होता.

२०१७ मध्ये त्या चंद्रपूर येथील मुलींच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्राचार्य (गट-ब) म्हणून रुजू झाल्या. शासकीय सेवा ही केवळ पद नसते तर ती सतत शिकण्याची आणि जबाबदाऱ्या स्वीकारण्याची प्रक्रिया असते. अनेक प्रशासकीय अडचणी, मर्यादा आणि आव्हाने आली पण त्यांनी प्रत्येक प्रश्नाकडे समस्येऐवजी संधी म्हणून पाहिले. संस्थेची गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा आत्मविश्र्वास, शिक्षकांचे समन्वय आणि प्रशासनातील पारदर्शकता यांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. आठ वर्षांच्या यशस्वी सेवेनंतर त्यांना वर्ग-१ अधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आणि साकोली येथे प्राचार्या म्हणून नवीन जबाबदारी स्वीकारण्याची संधी मिळाली. आज त्या विभागात कर्तव्यदक्ष, निर्णयक्षम आणि विद्यार्थीकेंद्रित अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. कौशल्य विकास ही केवळ सरकारी योजना नसून युवकांच्या भविष्याचा पाया आहे, या विश्र्वासाने त्या सातत्याने कार्यरत आहेत.

आज देशाला रोजगारक्षम, प्रशिक्षित आणि आत्मनिर्भर युवकांची गरज आहे. उद्योगांना कुशल मनुष्यबळ हवे आहे. अशा वेळी आयटीआयसारख्या संस्था राष्ट्रनिर्मितीचे केंद्र बनतात. त्या संस्थांचे नेतृत्व करणारे अधिकारी म्हणजे भविष्यातील भारत घडवणारे शिल्पकार असतात. प्रणाली दहाटे यांचे कार्य या व्यापक राष्ट्रीय ध्येयाशी जोडलेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे साधेपणा. पद वाढले, जबाबदाऱ्या वाढल्या, परंतु पाय मात्र जमिनीवरच राहिले. विद्यार्थ्यांशी संवाद, सहकाऱ्यांशी सुसंवाद, कामातील शिस्त आणि निर्णयातील पारदर्शकता यामुळे त्यांनी विश्र्वासार्ह अधिकारी म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा संपूर्ण जीवनप्रवास एक महत्त्वाचा संदेश देतो की, गरीबी अडथळा असू शकते पण ती यशाचा अंत नसते. योग्य संधी, शिक्षण, जिद्द आणि कुटुंबाचा विश्र्वास असेल तर कोणतीही मुलगी उच्च पदापर्यंत पोहोचू शकते.प्रशासकीय जबाबदाऱ्यांमुळे सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय राहणे शक्य होत नसले, तरी त्यांना आंबेडकरी विचारांची मांडणी करणाऱ्या 'कोण म्हणतो टक्का दिला?' या नाटकात अभिनय करून वैचारिक चळवळीचा एक छोटासा भाग होण्याचे भाग्य लाभले. चंद्रपूर येथे या नाटकाचे काही यशस्वी प्रयोगही झाले. समाजप्रबोधनाच्या अशा सांस्कृतिक माध्यमातून योगदान देता आले, ही त्यांच्या करिता कायमची समाधानाची बाब आहे.

आज समाजात मुलींच्या शिक्षणाबद्दल बोलले जाते, परंतु प्रणाली दहाटे यांचा प्रवास हे त्या विचाराचे जिवंत उदाहरण आहे. संघर्ष हा त्यांच्या आयुष्याचा अध्याय होता, शिक्षण त्यांची ताकद होती, जिद्द त्यांची ओळख ठरली आणि कर्तव्यनिष्ठा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी सही बनली. शिष्यवृत्तीवर शिक्षण घेणारी एक विद्यार्थीनी पुढे वर्ग-१ अधिकारी बनते, हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याची जबाबदारी स्वीकारते आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत योगदान देते. यापेक्षा प्रेरणादायी प्रवास कोणता? ११ जुलैच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड कार्यऊर्जा आणि अधिक व्यापक यश लाभो. त्यांच्या नेतृत्वाखाली आणखी अनेक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा मिळो, अनेक कुटुंबांचे भविष्य उजळो आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची ही वाटचाल अधिक वेगाने पुढे जावो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.



प्रवीण बागडे
(नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# लातूर येथे सहकार संकुलाचे शनिवारी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत भूमिपूजन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील महात्मा फुले भाजी मार्केटच्या मागे सहकार संकुलाची उभारणी करण्यात येणार आहे. या इमारतीचे भूमिपूजन शनिवार, ११ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते आणि सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होईल. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची यावेळी प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

लातूर जिल्ह्यातील नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व दर्जेदार शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सहकार विभागाच्या अधिपत्याखालील लातूर शहरातील ११ क्षेत्रीय कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी हे सहकार संकुल उभारले जात आहे. या नवीन इमारतीमुळे शासकीय कामकाज अधिक कार्यक्षम होईल. तसेच नागरिकांना विविध सेवा एकाच ठिकाणी सुलभपणे उपलब्ध होतील. त्यामध्ये आधुनिक कार्यालयीन सुविधा, स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी कक्ष, बैठक व्यवस्था, अभिलेख कक्ष, संगणकीकृत कामकाजासाठी आवश्यक सुविधा, नागरिकांसाठी प्रशस्त प्रतीक्षागृह, स्वच्छतागृहे तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी सुलभ प्रवेश व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या सहकार संकुल इमारत भूमिपूजन कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन लातूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक व्ही. एल. पोतंगले यांनी केले आहे.




### सहकार विभागाची ११ कार्यालये एकाच छताखाली येणार

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सहायक निबंधक सहाकारी संस्था, जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (साखर), सहकारी संस्था, जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (बँक) सहकारी संस्था, जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-२(पणन) सहकारी संस्था, जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-२ (पदूम) सहकारी संस्था, लेखा परीक्षक श्रेणी -२ सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, जिल्हा कार्यालय लातूर अशी एकूण ११ कार्यालये सहकार संकुलात एकाच छताखाली येणार आहेत.

## केज येथे आडत मुनिमा विरुद्ध फसवणूकीचा गुन्हा नोंद




**केज/प्रतिनिधी :** येथील सौदागर ट्रेडिंग या आडत दुकानाच्या मालकाने त्यांच्या मुलाकडे दुकानात ठेवायला दिलेले ३४ लाख रुपयाचे धनादेश आडत मालकाची परवानगी न घेता स्वतःच्या बँकेच्या खात्यात जमा करून त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी हाजीमौला सालमसाहब सौदागर यांच्या फिर्यादीवरून मुनीम शफिक आतिक शेख रा धारूर याच्या विरुद्ध केज पोलिसात गुरूवारी दुपारी गुन्हा नोंद झाला आहे.

केज येथील समता नगर येथील रहिवाशी हाजीमौला सलामसाहब सौदागर यांचे केजच्या मार्केट यार्ड परिसरात आडत दुकान आहे. त्यांनी दि. १७ जून रोजी सकाळी १० ते दि. २० जून रोजी रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान हाजीमौला सौदागर यांनी ३४ लाख रुपयाचे धनादेश मुलाकडे देऊन दुकानात ठेवण्यासाठी दे म्हणुन मुनीम शफिक आतिक शेख यांच्याकडे दिले होते. परंतु त्याने विश्वासघात करून दुकानात ठेवण्यासाठी दिलेले ३४ लाखाचे धनादेश त्यांच्या मुलाकडे न देता स्वतःच्या बँकेच्या खात्यात ३४ लाख रुपयाची रक्कम जमा करून हाजीमौला सौदागर यांचा विश्र्वासघात करून मुलाकडे दुकानात ठेवायला दे म्हणुन दिलेले ३४ लाखाचे धनादेश धनादेश देणाऱ्याची परवानगी न घेता स्वतःच्या बँकेच्या खात्यात जमा करून फसवणूक केली. म्हणुन हाजीमौला सौदागर यांच्या फिर्यादीवरून मुनीम शफिक आतिक शेख रा धारूर याच्या विरुद्ध केज पोलिसात गुरूवारी दुपारी गुन्हा नोंद झाला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक आसद शेख हे पुढील तपास करीत आहेत.

## इतर मागासवर्गीय समाजातील बेरोजगार युवक-युवतींसाठी विविध कर्ज योजना; ऑनलाईन अर्जाचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व त्याअंतर्गत कार्यरत असलेल्या १४ महामंडळांच्या वतीने इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी आणि सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत १ लाखांपर्यंतची थेट कर्ज योजना, २० टक्के बीज भांडवल कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना आणि महिला स्वयंसिद्धी कर्ज व्याज परतावा योजना अशा विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र उमेदवारांना घेता येणार आहे.

या सर्व कर्ज योजना पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपाच्या असून, इतर मागास प्रवर्गातील इच्छुक व पात्र अर्जदारांनी नाव नोंदणीसाठी आणि अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडण्यासाठी महामंडळाच्या www.msobcfdc.org या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करणे अनिवार्य आहे. या योजनांबाबत अधिक सविस्तर माहिती आणि मार्गदर्शनासाठी इच्छुक नागरिकांनी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेट मार्केट यार्ड, जुने डालडा फॅक्ट्री कंपाऊंड, लातूर या पत्त्यावर किंवा ०२३८२-२५३३३४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा व्यवस्थापक एस.एन. झुंजारे यांनी केले आहे.

## लोणावळ्यात पर्यटकांचं अपहरण करणाऱ्या पोलिसांना दणका! एकाचं निलंबन, तर ५ जणांना...; ५ लाखांची मागितली होती खंडणी

**पुणे/प्रतिनिधी :** लोणावळा पर्यटनस्थळी पर्यटकांनाच खंडणीसाठी लक्ष्य केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अंमली पदार्थ प्रकरणात अडकवण्याची भीती दाखवत पर्यटकाकडे तब्बल पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे, या प्रकरणातील एका पोलीस अंमलदाराला निलंबित करण्यात आलं आहे. तर दोन पोलीस अंमलदार, दोन होम गार्ड आणि एका ट्रॅफिक वॉर्डनला न्यायालयाने १३ जुलैपर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे.लोणावळा येथे पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकाला अंमली पदार्थ बाळगल्याचा संशय व्यक्त करत कारवाईची भीती दाखवून पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. फिर्यादी भूषित उमेश शर्मा ५ जुलै रोजी मित्रांसह चारचाकी वाहनातून लोणावळा येथे फिरण्यासाठी आले होते. यावेळी आरोपींनी त्यांना अमली पदार्थ प्रकरणात अडकवण्याची धमकी देत पाच लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी तात्काळ तपासाचे आदेश दिले. त्यानंतर या प्रकरणातील पोलीस अंमलदार अमोल महादेव ननावरे यांना निलंबित करण्यात आले. दरम्यान, पोलीस अंमलदार अमोल ननावरे, तुषार डावरे, होमगार्ड तुषार घाडगे, किसन बोंबले आणि ट्रॅफिक वॉर्डन नितेश चव्हाण यांना न्यायालयाने १३ जुलैपर्यत पोलीस कोठडी सुनावली असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. पुण्यातील विमाननगरमधील भूषित उमेश शर्मा, मोहम्मद काशान आजमी, त्यांची पत्नी फायजा जमील आणि साले सय्यद जुबेर अहमद पावसाळा सुरु झाल्याने त्याचा आनंद लुटण्यासाठी लोणावळ्याला गेले होते. कामशेतजवळ ६ पोलिसांनी त्यांची कार अडवली. त्यानंतर त्यांना अंमली पदार्थाच्या खोट्या केसमध्ये अडकवण्याची धमकी दिली.

# संजिवनी नागमोडे यांना राज्य शासनाचा जिजामाता कृषिभूषण पुरस्कार प्रदान!




**लातूर/प्रतिनिधी :** पारंपरिक शेतीला आधुनिकता, सेंद्रिय पद्धती आणि पूरक व्यवसायांची जोड देऊन शेतीत क्रांती घडवणाऱ्या लातूर जिल्ह्यातील चिंचोलीरावबाडी येथील प्रयोगशील महिला शेतकरी संजिवनी अंगद नागमोडे यांना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते राज्य शासनाच्या कृषी विभागाचा जिजामाता कृषिभूषण पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

नुकतेच वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे झालेल्या या कृषि पुरस्कार सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, आयुक्त सुरज मांढरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीमती नागमोडे यांनी आपल्या शेतात दूध उत्पादन, शेळीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन यांसारख्या कृषीपूरक व्यवसायांची यशस्वी सांगड घालत फळपिके व चारा पिकांची लागवड केली असून, याद्वारे त्यांनी नैसर्गिक शेतीवर विशेष भर दिला आहे. जमिनीचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी रासायनिक खतांचा वापर पूर्णपणे टाळून त्या शेणखतासह इतर सेंद्रिय निविष्ठांचे उत्पादन व वापर स्वतःच्या शेतावरच करतात. शेतातील आणि गोठ्यातील टाकाऊ पदार्थांचा पुनर्वापर करण्याच्या उद्देशाने त्यांनी शेतावर बायोगॅस संयंत्र, गांडूळ खत निर्मिती, अझोला उत्पादन आणि कंपोस्ट खताचा प्रभावी वापर करून जमिनीची सुपीकता सातत्याने टिकवून ठेवली आहे. बायोगॅस निर्मितीमुळे त्यांच्या स्वयंपाकाची उत्तम सोय झाली असून, त्यातून निघणाऱ्या स्लरीचा वापर त्या शेतात दर्जेदार सेंद्रिय खत म्हणून करतात.

पाण्याचा अत्यंत कार्यक्षम वापर करण्यासाठी त्यांनी संपूर्ण शेतात प्रामुख्याने ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब केला असून, सिंचनाच्या शाश्वत सोयीसाठी सामूहिक व वैयक्तिक शेततळे, कुपनलिका आणि विहीर यांसारख्या जलस्रोतांची उभारणी केली आहे. पिकांवरील नैसर्गिक पद्धतीने कीड व रोग नियंत्रणासाठी त्या केवळ जैविक घटकांवर भर देतात, ज्यासाठी कृषी विज्ञान केंद्र लातूरकडून मिळणाऱ्या जैविक कीटकनाशकांसह दशपर्णी अर्क आणि निंबोळी अर्काचा वेळोवेळी वापर केला जातो.

शासकीय योजनेच्या लाभातून त्यांनी ३ अश्वशक्ती क्षमतेचा सोलर पंप संच आणि गोबरगॅस संयंत्र बसवून शेतीमध्ये अपारंपरिक ऊर्जेचा प्रभावी वापर सुरू केला आहे. जमिनीच्या मशागतीची कामे वेळेवर आणि सुलभ व्हावीत म्हणून त्यांनी आधुनिक विडर यंत्राचा यशस्वी वापर केला असून, ग्रास कटरच्या साहाय्याने शेतातील गवताची कापणी करून त्याचे शेतातच आच्छादन (मल्चिंग) म्हणून पुनर्वापर केला जातो. केवळ कच्च्या मालाच्या उत्पादनावर न थांबता त्यांनी कृषी प्रक्रिया उद्योगात मोठी भरारी घेतली असून, तेलबियापासून दर्जेदार तेल काढून तेलघाणा उद्योग उभारला आहे व आकर्षक पॅकिंगमधून त्याची विक्री सुरू केली आहे. तसेच सोलर ड्रायरचा वापर करून भाजीपाल्याची सुकवणी करून आणि शेतावर पॅलेट यंत्र बसवून जनावरे, शेळ्या, बोकड व कोंबड्यांसाठी पौष्टिक खाद्य उत्पादन त्या स्वतःच करतात.

आपल्या या सेंद्रिय शेतीमालाची विक्री करण्यासाठी त्यांनी व्हॉट्सअप, फेसबुक आणि यूट्यूब यांसारख्या डिजिटल माध्यमांद्वारे प्रसिद्धी करून शेतकरी ते ग्राहक थेट विक्री अशी यशस्वी साखळी निर्माण केली आहे. स्वतःच्या प्रगतीसोबतच ग्रामीण भागातील इतर महिलांना स्वावलंबी करण्यासाठी त्यांनी शाश्वत कृषी महिला शेतकरी गट व कर्तव्य सोपान बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची स्थापना केली असून, या माध्यमातून महिला उद्योग उभारणी व नैसर्गिक शेती प्रसारासाठी त्यांनी अत्यंत महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेवून राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत त्यांना जिजामाता कृषिभूषण पुरस्कार २०२४ देवून गौरविण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यात १४ जुलैपासून तालुकास्तरीय मेळाव्यांचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित युवक-युवतींना स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची व्याप्ती आणि माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तालुकास्तरीय मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यांमध्ये योजनेची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. हे सर्व तालुकास्तरीय मेळावे संबंधित तालुक्याच्या पंचायत समिती येथे सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात येणार आहेत.

यामध्ये १४ जुलै रोजी अहमदपूर, १५ जुलै रोजी औसा, १६ जुलै रोजी चाकूर, १७ जुलै रोजी शिरुर अनंतपाळ, २१ जुलै रोजी देवणी, २२ जुलै रोजी उदगीर, २३ जुलै रोजी जळकोट, २४ जुलै रोजी निलंगा, २७ जुलै रोजी रेणापूर आणि २८ जुलै रोजी लातूर येथील पंचायत समितीमध्ये मेळावा होईल. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांनी आधार कार्ड, पॅनकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला (टी. सी.), पासपोर्ट साईझ फोटो आणि ग्रामीण भागासाठी लोकसंख्या प्रमाणपत्र या आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी केले आहे.

## तुळशी माळा बनवणाऱ्याची संख्या ३०० वरुन थेट ६० वर, पंढरपुरात पारंपरिक कारागिरांवर उपासमारीची वेळ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** राज्याची आध्यात्मिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र पंढरपूर नगरीत सध्या आषाढी वारीचे वेध लागले आहेत. विठूरायाच्या दर्शनासाठी येणारा प्रत्येक भाविक भक्त मोठ्या आस्थेने आणि श्रद्धेने तुळशीची माळ खरेदी करतो. मात्र, गेल्या काही वर्षांत पंढरपुरात चायना मेड तुळशी माळांचा सुळसुळाट झाला असून, याचा मोठा फटका पिढ्यानपिढ्या पारंपरिक पद्धतीने तुळशीच्या माळा बनवणाऱ्या स्थानिक कारागिरांना बसला आहे. परिणामी, या कारागिरांवर आता बेरोजगारी आणि उपासमारीची वेळ आली आहे. या संदर्भात अधिक माहिती सतीश प्रकाश टम टम यांनी दिली.

आषाढी वारी अवघ्या काही दिवसांवर आली असल्याने दरवर्षीप्रमाणे यंदाही तुळशी माळा बनवण्याच्या कामाला वेग आला आहे.

# महायुती सरकारकडून अल्पसंख्याकांच्या विकासाकडे दुर्लक्ष; पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा

## माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांची विधानसभेत मागणी

**मुंबई :** सबका साथ सबका विकास अशा लोभस घोषणा देऊन सत्तेवर आलेल्या राज्यातील महायुती सरकारकडून अल्पसंख्याकांच्या विकासाकडे दुर्लक्ष होत आहे, ही वस्तुस्थिती आहे, अशा शब्दांत माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. विधानसभा पावसाळी अधिवेशनादरम्यान (१० जुलै) प्रश्नोत्तराच्या तासात आमदार देशमुख यांनी अल्पसंख्याक समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवरून सरकारचे लक्ष वेधले आणि या विभागासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.




### अपुऱ्या आर्थिक तरतुदीवर व्यक्त केली चिंता

सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी अल्पसंख्याक विकास विभागाच्या कामकाजावर आणि अपुऱ्या आर्थिक तरतुदीवर तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले संख्येने अल्प असलेल्या समाजाला विकासाच्या महामार्गावर आणण्यासाठी मागील सरकारने स्वतंत्र अल्पसंख्याक विभाग स्थापन केलेला असला, तरी विद्यमान सरकारकडून त्यासाठी अत्यल्प निधीची तरतूद होत असल्याने मुख्य हेतू साध्य होताना दिसत नाही. अल्पसंख्याक समाज अल्प आहे, म्हणून त्यांच्यासाठी शासनाने अल्प तरतूद करणे योग्य नाही.

### सभागृहात मांडलेल्या प्रमुख मागण्या

अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी केंद्र शासनाने पंतप्रधान १५ कलमी योजना आखली आहे. मात्र, महाराष्ट्रात जिल्हास्तरावर या योजनेच्या नियमित बैठकाच होत नाहीत. या बैठका नियमित घेऊन विकासाला गती द्यावी. अल्पसंख्याक समाजाला शासकीय नोकरीत योग्य प्रतिनिधित्व मिळाले आहे का, याचा शासनाने शोध घ्यावा आणि त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळवून द्यावे.

अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी अपेक्षित असलेली उर्दूगृहे, मुले आणि मुलींची स्वतंत्र वस्तीगृहे आणि प्रत्येक जिल्ह्यात मुले व मुलींसाठी किमान एक निवासी शाळा अशी संकुले उभारली जावीत आदीसह महत्त्वपूर्ण मागण्या मांडून माजी मंत्री, आमदार देशमुख यांनी सरकार यासंदर्भाने सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अल्पसंख्यांक समाजाला ते अल्प आहेत म्हणून त्यांच्यासाठी शासन अल्प तरतूद करणार नाही, या समाजाला ठराविक रेषेच्या वर आणण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी ग्वाही अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य तथा अल्पसंख्यांक विकासमंत्री मा. श्री. नरहरी झिरवळ यांनी सदरील चर्चेला उत्तर देताना यावेळी दिली.

वाढती महागाई लक्षात घेऊन अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक भत्त्यात वेळोवेळी वाढ केली जाईल, मागास, आदिवासी, ओबीसी, विद्यार्थ्यांसाठी ज्या पद्धतीने ठिकठिकाणी वस्तीगृहे उभारली जात आहेत त्याच धरतीवर अल्पसंख्याकांसाठीही वस्तीगृहे उभारली जातील. काही जिल्ह्यात अल्पसंख्यांक विद्यार्थिनी विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा सुरू केल्या आहेत, उर्वरित जिल्ह्यातही अशा निवासी शाळा सुरू करुन त्यासाठी पुरेशा अनुदानाची व्यवस्था केली जाईल असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.